**महाराष्ट्र शासन**

तात्काळ

क्र.संकीर्ण–२०१०/(२६४/१०)/विशि–३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– २८ ऑक्टोबर, २०१०

प्रति,
**कुलसचिव,**
पुणे विद्यापीठ,
पुणे.

**विषय :– विद्यापीठात दारूबंदी व व्यसनमुक्तीचा प्रचार**
**संदर्भ :– आपले पत्र क्र.ए एन–८९८६, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१०.**

महोदय,

उपरोक्त विषयांच्या संदर्भाधिन पत्रान्वये आपण मागविलेली शासनाने दिनांक ३ ऑगस्ट, २०१० च्या पत्राची प्रत या पत्रासोबत आपणाकडे पाठविण्यात येत आहे.

आपला,

सही
(प्र. गि. कानडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

---

तात्काळ
क्र.संकीर्ण–२०१०/(२६४/१०)/विशि–३

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई – ४०००३२.
दिनांक :– ३ ऑगस्ट, २०१०

प्रति,
**कुलसचिव,**
सर्व अकृषी विद्यापीठ.

**विषय :– विद्यापीठात दारूबंदी व व्यसनमुक्तीचा प्रचार...**

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या क्र. डीडीपी–२००८/प्र.क्र.४२५२/सुधार–१, दिनांक २०/०४/२०१० च्या पत्राची प्रत या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे. या प्रकरणी माहिती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास तातडीने सादर करावयाचे असल्याने पत्रात नमूद केलेल्या मुद्दा क्र. ४,६ व १० बाबत कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा स्वयंस्पष्ट अभिप्राय त्वरीत शासनास सादर करावे ही विनंती.

आपला,

सही
(प्र. गि. कानडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत : संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना तातडीच्या कार्यवाहीसाठी अग्रेषित**

महाराष्ट्र शासन

<u>तात्काळ</u>
<u>बैठकीची सूचना</u>
दिनांक २६/१०/२०१०

क्रमांक:—डीडीपी—२००८/प्र.क्र.४२५२/सुधार—१
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई — ४०० ०३२.
दूरध्वनी क्र.२२७९३८५७ फॅक्स क्र. २२८३६६८
दिनांक :— २० एप्रिल, २०१०.

प्रति,
अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
ग्राम विकास विभाग,
गृह विभाग,
विधी व न्याय विभाग,
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शालेय शिक्षण विभाग/उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
सामान्य प्रशासन विभाग (मुख्य निवडणूक अधिकारी)
वित्त विभाग/नियोजन विभाग, मंत्रालय मुंबई.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे

**विषय :— दारूबंदी धोरणाबाबत चर्चा करण्यासाठी दिनांक २६/०४/२०१० रोजी सहयाद्री अतिथीगृह, मुंबई येथे बैठक.**
**संदर्भ :— क्रमांक:—डीडीपी—२००९/प्र.क्र.१४९/सुधार—१, दिनांक १३/१२/०९ ची टिप्पणी व अ.शा. पत्र दिनांक ०४/०२/२०१०.**

विषयांकित प्रस्तावाबाबत संदर्भाधिन पत्रांचे कृपया अवलोकन व्हावे. दारूबंदी धोरणाच्या मसुद्यावर श्री. अण्णा हजारे हे चर्चा करणार आहेत. सदर बैठक सहयाद्री अतिथीगृह, मलबारहिल, मुंबई येथे सोमवार दिनांक २६/०४/२०१० रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेली आहे. दारूबंदी धोरणाच्या मसुद्याची प्रत सोबत जोडण्यात आली आहे. सदर धोरणातील आपल्या विभागाशी संबंधित मुद्यांबाबतच्या माहितीसह सदर बैठकीस आपण व्यक्ती:श हजर राहावे, ही विनंती.

सही
**(व. मुं. भरोसे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत माहितीकरिता :
मुख्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक
मंत्री (सामाजिक न्याय) यांचे स्वीय सहाय्यक
राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे स्वीय सहाय्यक
प्रधान सचिव, सामाजिक न्याय यांचे स्वीय सहाय्यक
श्री. य. अण्णा हजारे, राळेगण सिध्दी.

<u>अस्तित्वात असलेल्या</u>

<u>कायद्यात व नियमात बदल</u> :

१) दारूबंदी विषयक गुन्हे दखलपात्र व अजामीनपत्र करता येतील कां हे तपासून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणे.

२) मुंबई दारूबंदी अधिनियम १९४९ च्या कलम १३९ (ब) मधील तरतुदीप्रमाणे दारू मुक्त क्षेत्र घोषित केल्यास, त्या क्षेत्रात दारूचे उत्पादन, सेवन व विक्रीबाबत परवाना दिला जात नाही तथापि, वैद्यकीय कारणास्तव मद्य पिण्याचा परवाना देणे गरजेचे आहे.

३) जनतेच्या मागणीनुसार मतदानाने रद्द केलेला परवान्याचा वाद न्याय प्रविष्ट असल्यास, न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत परवाना रद्द केल्याबाबतच्या आदेशाला स्थगिती न देणे ही न्यायालयाच्या अखत्यारीतील बाब आहे. (मुद्दा वगळण्यात येईल.)

४) दारू बंदी अधिनियम १९४९ च्या कलम १३९ (ब) मधील शिक्षेच्या तरतुदीत किमान ५ वर्षे शिक्षा व रु. ५,०००/– दंडाची शिक्षा अशी सुधारणा करण्याचे पडताळून पाहण्यात येईल. (सूचना असल्याचे वगळण्यात येईल)

५) मुंबई ग्राम पंचायत अधिनियमात सुधारणा करून अधिसूचित क्षेत्रातील ग्रामसभांचें अधिकार कलम ५४ (अ) (ई) 'मादक द्रव्यांची विक्री व सेवन यावर संबंधित पंचायतीमार्फत बंदी आणणे किंवा त्यांचे विनियमन करणे किंवा निर्बंध घालणे' असे अधिकार राज्यातील ग्राम सभांना देणे हे तपासून कार्यवाही करणे.

६) अवैध दारूचे उत्पादन, विक्री, साठा, वाहतूक इ. करणाऱ्या व त्याला मदत करणाऱ्या व्यक्तिला कडक शासन करणे.

<u>प्रचार प्रसार</u> :

१) शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात दारू व्यसनाच्या दुष्परिणामांची माहिती समाविष्ट करणे.

२) दारूचे दुष्परिणाम, त्याचे महिला विरोधी व गरिबी विरोधी स्वरूप समाजासमोर आणण्यासाठी शाळा व महाविद्यालयात पथनाटय, एकांकिका, पोस्टर्स, स्लोगन्स, इतर स्पर्धांचे आयोजन करणे.

३) मद्यपानाच्या दुष्परिणामांची चित्रफित/चलचित्र तयार करून शाळा, महाविद्यालये, यात्रा, गणेशोत्सव, महिला मंडळे अशा सार्वजनिक उत्सवांच्या ठिकाणी दाखविणे.

४) मादक पदार्थ विरोधी दिन, तंबाखू विरोधी दिन, धूम्रपान विरोधी दिन, नशाबंदी दिवस तसेच सप्ताह पाळण्यात यावेत व अशा दिवशी शैक्षणिक संस्थामधून प्रचार फेरी काढणे.

५) दारूचे दुष्परिणाम दर्शविणाऱ्या दूरदर्शन मालिका, लघु–पट, हिंदी–मराठी भाषेत जाहिराती, दूरवाणी माध्यमामार्फत प्रसारित करणे.

६) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दवाखान्यातून नेऊन व्यसनांच्या दुष्परिणामांची माहिती देणे.

७) दारूच्या प्रत्येक बाटलीवर/कॅनवर दारू शरीरास हानीकारक असल्याचे ठळकपणे सचित्र दर्शविणे.

८) व्यसनमुक्त गांव अभियान राबवून दूरवाणी व दूरदर्शन त्याची व्यापक प्रसिध्दी करणे. व्यसनमुक्त गावास देण्यात येणाऱ्या पुरस्काराची रक्कम राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र स्वरूपात तीन वर्षाच्या ठेवीसाठी देणे, जेणेकरून ते गाव किमान तीन वर्षे तरी व्यसनमुक्त राहील.

९) प्रत्येक पोलीस ठाण्यावर व महामार्गावर जागोजागी ब्रेथ ॲनलायझर मशीन उपलब्ध करून देणे.

१०) समाज कार्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दारूमुक्ती प्रचार कार्यक्रम विषयाचा कार्यानुभव अनिवार्य करून त्यांचा प्रचार कार्यात सक्रीय सहभाग करणे.

११) अल्हकोहोलिक अनॉनिससच्या कार्यकर्त्यांचा दारूबंदी प्रचारात सहभाग करणे.

१२) राज्यात एकूण आठ ''ड्राय डे'' आहेत. स्थानिक पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांना ३ अतिरिक्त ''ड्राय डे'' घोषित करण्याची परवानगी आहे.

१३) व्यसनाधिन शासकीय कर्मचाऱ्यांना व्यसनमुक्तीसाठी कौन्सिलिंगची सुविधा तसचे व्यसनमुक्तीसाठी परावर्तित रजा मंजुर करणे.

१४) नशाबंदी दिवस तसेच सप्ताह पाळण्यात यावे व त्यादिवशी शाळा/महाविद्यालयाने रॅली काढावी.

१५) किर्तन तथा लोककला माध्यमातून दारूबंदी व व्यसनमुक्तीचा प्रचार करणे.

---

**विद्यार्थी कल्याण मंडळ,**
पुणे विद्यापीठ, पुणे – ७.
संदर्भ क्र.विकमं/२०१०/६८१
दिनांक – १४/१२/२०१०

<u>प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी</u> :

मा. प्राचार्य/मा. संचालक /मा. विभागप्रमुख
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था /पुणे विद्यापीठ पदवीव्यूत्तर विभाग
परिपत्रक महाविद्यालयाच्या/संस्थेच्या/विभागाच्या नोटीस बोर्डावर लावून संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ